सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
गृहविभाग
पोलीस अधीक्षक, कार्यालय, लोहमार्ग, पुणे
जुने सीआयडी ऑफीस कंपाउंड, शिवाजीनगर,संगम ब्रीज जवळ, पुणे
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २५५४१५३३
फॅक्सक्रमांक - ०२० - २५५४४६३१
ई मेल - sp.railways.pune@mahapolice.gov.in

जा.क्र.प्रलि/आस्था/पदोन्नती /२०२२/ 1144

पुणे दिनांक : 21 /०२/२०२३

संदर्भ :- १. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय
क्रमांक बीसीसी २०१८ / प्र.क्र.३६६ / १६ ब, दिनांक १८/०२/२०२१
२. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय
क्रमांक बीसीसी २०१८ / प्र.क्र.३६६ / १६ ब, दिनांक ७/०५/२०२१

विषय :- **पोलीस हवालदार ते सहायक पोलीस उप-निरीक्षक पदी पदोन्नतीबाबत.**

-----oooo-----

**आदेश -**

खालील नमुद पोलीस हवालदार यांना सहायक पोलीस उप-निरीक्षक या पदावर त्यांनी पदग्रहण केल्याच्या दिनांकापासून त्यांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात रिक्त पदांवर पदोन्नती देण्यात येत आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतिम आदेशाच्या अधीन राहुन तात्पुरत्या पदोन्नती देण्यात येत असून संबंधित पोलीस हवालदार यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजे सेवाज्येष्ठतेचे कोणतेही अधिकार प्राप्त होणार नाहीत.

**दिनांक १८/०२/२०२१ चे शासन निर्णयानुसार रिक्त पदे सेवाज्येष्ठतेनुसार भरण्याबाबत निर्गमित केलेल्या सुचनानुसार पोलीस अधीक्षक लोहमार्ग पुणे आस्थापनेवरील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार भरण्यात येत आहेत. दिनांक १८/०२/२०२१ च्या संदर्भाकिंत शासन निर्णयानुसार कोणत्याही आरक्षणाचा विचार न करता १००% पदे पदोंन्नतीने भरण्यात येत आहेत. तरी भविष्यात सुधारित शासन निर्णय निर्गमित झाल्यास पदोन्नती देण्यात आलेल्या पोलीस अंमलदारांना पदावनत करण्याच्या अटीच्या अधीन राहून खालील पोलीस अंमलदार यांना पोलीस हवालदार पदावरुन सहायक पोलीस उप-निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात येत आहे.**

**• पोलीस हवालदार ते सहा.पोलीस फौजदार पदोन्नती •**

**सहा.पोलीस फौजदार रू. २९२००-९२३०० (पे मॅट्रीक्स स्तर एस-१०)**

| अ.क्र | पदनाम/नांव | मुळ प्रवर्ग | नेमणूक |
|---|---|---|---|
| १ | ४३०/ संजय लक्ष्मण पवार | खुला | मुख्यालय खडकी |
| २ | ३७०/अजित विश्वास सावंत | खुला | मिरज |
| ३ | ४४३/विकास मुरलीधर रोकडे | अजा | सोलापूर |
| ४ | ३९५/भार्गव दत्तात्रय साखरे | इमाव | मिरज |

**भाग - २**

खालील नमूद पोलीस अंमलदार यांना सेवाजेष्ठतेनुसार सन २०२०-२२ च्या निवडसूचीमध्ये पोलीस हवालदार ते सहा.पोलीस फौजदार या पदावर पदोन्नती देणेकामी त्यांची नावे निवडसूचीत घेण्यात आलेली आहेत. तथापि त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कारणाकरीता त्यांना पदोन्नती देण्यात आलेली नाही.

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | पदनाम/नांव | मुळ प्रवर्ग | अपात्रची कारणे |
|---|---|---|---|
| १ | पोहवा/४९३ नवनाथ लक्ष्मण पवार | अनुसुचित जमाती | **जात वैधता नाही (अधिसंख्य)** |
| २ | पोहवा/३१६ चिंतामणी साधू पवार | अनुसुचित जमाती | **जात वैधता नाही (अधिसंख्य)** |
| ३ | पोहवा/४०६ दिपक शंकर सुर्यवंशी | इतर मागास प्रवर्ग | **जातवैधता नाही/ शिक्षा चालू** |
| ४ | पोहवा ७५७/अनिल विठठलराव आदवडे | खुला | **वेतनवाढ रोखणे शिक्षा चालू** |

राज्य राखीव पोलीस बल गटातील पोलीस अंमलदार यांची सेवाज्येष्ठता गृह विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.पीएमएन-०३१४/२०३/प्र.क्र.६८/पोल-५ब, दि. १० डिसेंबर २०१८ अन्वये, लावण्यात आलेली असून त्यानुसार त्यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे.

उपरोक्त पदोन्नती महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन निभागाच्या पत्र क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६ ब, दिनांक १८/०२/२०२१ अन्वये, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या संदर्भीत क्रमांक २७९७/२०१५ वरील दि. ०४/०८/२०१७ रोजी उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाकडून होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून यापुढे पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त आलेली सर्व १००% पदे कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा विचार न करता दि. २५/०५/२००४ रोजीच्या सेवाज्येष्ठतेच्या स्थितीनुसार केवळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात यावीत, असे उपरोक्त शासन निर्णयामध्ये सुचना देण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शानिक्र. वशिअ-१२१४/प्र.क्र.५१(२)/११, दि. १७/११/२०१४ परिपत्रकात नमुद केल्याप्रमाणे पदोन्नती दिलेल्या पोलीस अंमलदारांची मत्ता व दायित्वाची विवरणपत्रे भरून घेण्यात येवून संबंधित लोहमार्ग पोलीस ठाण्यास सादर करावीत.

उपरोक्त पदोन्नती मिळालेल्या अंमलदारांच्या वेतनाची वेतन निश्चिती आस्थापनेने करावी व त्यांना विकल्प दयावयाचा असल्यास पदोन्नती दिनांकापासून ०१ महिन्यात विकल्प देण्याबाबत सूचित करावे. **एखादा पोलीस अंमलदार सध्या मोठी शिक्षा भोगत असेल अथवा निलंबित असेल तसेच गुन्हा व न्यायालयीन प्रकरणाखाली शिक्षा भोगत असेल तर त्यांना पदोन्नती न देता या कार्यालयास तात्काळ तसा अहवाल सादर करावा.**

जे अंमलदार सिकमध्ये किंवा अर्जित रजेवर असतील तर ते हजर झाल्याच्या तारखेपासून त्यांना पदोन्नती देण्यात येऊन तसे या कार्यालयास कळवावे.

जे अंमलदार इतरत्र बदलून/प्रतिनियुक्तीवर गेले असतील वा प्रतिनियुक्तीवर गेले असतील त्यांच्या बाबतची माहिती संबंधित प्रभारी अधिकारी यांनी या कार्यालयास कळविणे आवश्यक राहील.

नमुद पोलीस अंमलदारांना पदोन्नती देताना पोलीस अधीक्षकांना आनंद होत आहे. पदोन्नती मिळालेल्या पोलीस अंमलदार यांना समारंभपुर्वक पदोन्नती बहाल करून त्यांच्या पदोन्नतीचे आदेश रोल कॉलवर सर्व पोलीस अंमलदारांसमोर वाचून दाखवावेत.

उपरोक्त पदोन्नती आदेश पुणे लोहमार्ग पोलीस संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत.

**पदोन्नती झालेल्या वरील नमूद पोलीस अंमलदरांचे पुन्हा एकदा अभिनंदन व पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा.**

**( श्रीकांत य धिवरे ) भा.पो.से.**
**पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे**

प्रति,

प्रभारी अधिकारी पुणे/मिरज/सोलापूर पोलीस ठाणे लोहमार्ग पुणे
राखीव पोलीस निरीक्षक, लोहमार्ग, पुणे

प्रत, - प्रमुख लिपीक, लेखा शाखा/वेतन लिपीक
पोलीस राजपत्रक/आस्था-१ लोहमार्ग पुणे.

प्रत- अधिदान व लेखा अधिकारी, पुणे

Scanned with OKEN Scanner